**प्रवीण परदेशी**
भा. प्र. से.
महानगरपालिका आयुक्त

MUNICIPAL CORPORATION OF GREATER MUMBAI
बृहन्मुंबई महानगरपालिका

क्रमांक : एमजीसी/ए/८४९८
दिनांक : २७/५/१८

**विषयः विविध वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणा-या तक्रारींची त्वरीत नोंद घेऊन कार्यवाही करणे; तसेच चुकीच्या बातम्यांचा खुलासा तातडीने देणेबाबत.**

विविध वर्तमानपत्रात बृहन्मुंबई महापालिकेकडून दिल्या जाणा-या अनेक सेवांबाबत बातम्यांच्या रुपात किंवा सचित्र स्वरुपातील तक्रारी नियमितपणे प्रसिद्ध होत असतात. या तक्रारींच्या अनुषंगाने नियमितपणे पुढील अपेक्षित कार्यवाही होताना दिसत नाही, असे निदर्शनास आले आहे. या अनुषंगाने अपेक्षित कार्यवाही करणे व त्याबाबत निर्धारित कालावधीत खुलासा वर्तमानपत्रांना पाठविणे याची कार्यपद्धती खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

**अ.** सर्वच वर्तमानपत्रातील तक्रारींची गंभीर दखल घेऊन पूरक कार्यवाही वेळोवेळी करणे आवश्यकच असते. तरीही हे काम नियमितपणे व्हावे व या कामात सुसूत्रता यावी यासाठी सुरुवातीला टाईम्स ऑफ इडिया, इंडियन एक्सप्रेस, हिंदुस्थान टाईम्स, मुंबई मिरर आणि मिड डे ही इंग्रजी वर्तमानपत्रे; महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता, लोकमत, सकाळ आणि सामना ही मराठी वर्तमानपत्रे यांना प्राधान्य द्यायचे आहे.

**ब.** वर निश्चित केलेल्या वर्तमानपत्रातील तक्रारींची कात्रणे तक्रारीच्या स्वरुपानुसार सबंधित अतिरिक्त आयुक्त / उपायुक्त / विभाग प्रमुख / सहाय्यक आयुक्त इत्यादींना 'व्हॉट्स ऍप'द्वारे रोज सकाळी १०.३० पूर्वी पाठविण्याची जबाबदारी 'माध्यम सल्लागार' यांची राहील.

**क.** या तक्रारींच्या अनुषंगाने संबंधितांनी वस्तुनिष्ठ खुलासा, गरज असेल तेथे छायाचित्रासह, माध्यम सल्लागार यांना त्या-त्या दिवशी जास्तीत जास्त दुपारी २ वाजेपर्यंत 'इ-मेल'

(media.advisor.mcgm@gmail.com) अथवा 'व्हॉट्स ऍप'द्वारे (मोबाईल क्रमांक - ९८३३३८३८८७) पाठवावा. हा अहवाल पाठविण्याची अंतिम जबाबदारी संबंधित अधिका-यांची राहील. बातमी खरी असल्यास पालिका काय करणार आहे? आणि तक्रारीत तथ्य नसेल तर त्याबाबतची वस्तुस्थिती काय आहे? याच्या सविस्तर तपशीलासह खुलासे देणे अपेक्षित आहे.

**ड.** वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणा-या तक्रारींचे संनियंत्रण करताना ज्या संबंधित अधिका-याकडून अहवाल २ दिवसातही उपलब्ध न झाल्यास त्याबाबतचा तपशील मा. आयुक्तांना सादर करण्याची जबाबदारी व्यक्तीशः माध्यम सल्लागार यांची राहील.

| **तपशील** | **खुलासा प्राप्त झाला किंवा नाही** | **जबाबदार अधिकारी** |
|---|---|---|
| | | |

या आदेशाचे काटेकोरपणे पालन होईल हे पाहण्याची जबाबदारी सर्व संबंधित अतिरिक्त आयुक्त / उपायुक्त / खातेप्रमुख / सहाय्यक आयुक्त यांची राहील.

महापालिका आयुक्त

सर्व अतिरिक्त महापालिका आयुक्त

सर्व उपायुक्त

सर्व खातेप्रमुख / सहाय्यक आयुक्त

प्रत :